# देगलूर महाविद्यालयात मिनर्व्हा विद्यापीठात प्रवेशपात्र तन्मय माकाचा सत्कार



देगलूर :-(हिंदूसम्राट प्रतिनिधी शशिकांत पटणे यांजकडून):-येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाचा विद्यार्थी तन्मय राहुल माका या विद्यार्थ्याने दीड कोटीची शिष्यवृत्ती मिळवत पदवी शिक्षणाकरीता अमेरिकेतील मिनर्वा विद्यापीठात प्रवेश मिळविला आहे यानिमित्ताने त्याचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ होते यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे संस्थेचे सचिव शशिकांतशेठ चिद्रावार सहसचिव सूर्यकांतराव नारलावार कार्यकारणी सदस्य देवेंद्र सेठ मोतेवार ,रवींद्र आप्पा दाडे यांची उपस्थिती होती.

तन्मय माका आपल्या सत्कारास उत्तर देताना म्हणाला आपण केलेल्या प्रयत्नाला यश आले आहे माझे प्राथमिक शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण देगलूर सारख्या ठिकाणी झाले असून कोरोना काळातील वेळ मी सत्कारणी लावण्याचे ठरवून सतत अभ्यास केला सोशल मिडीयातून माहिती घेतली त्याचा योग्य वापर केला. अमेरिकेच्या विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी एस ए टी ही प्रवेश परीक्षा दिली यात १४५०गुण मिळविले भारतामधून सहा विद्यार्थ्यांनाच या विद्यापीठात प्रवेश मिळतो यात माझा क्रमांक लागला हे विशेष वाटते.प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्यातील गुण व विषयातील आवड लक्षात घेऊन जिद्दीने अभ्यास केला तर नक्कीच यश मिळते असे सांगून आपले पदवीचे शिक्षण पूर्ण करून भारतातच सेवा करण्याचे निश्चित केले असल्याचे त्याने सांगितले यावेळी त्याचे आजोबा माजी लेखापाल गंगाधर पांडे , माजी नगरसेवक महादेव माका आई डॉ.शिल्पा माका यांनीही आपले मनोगत व्यक्त केले शेवटी अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवचरण गुरुडे यांनी तर आभार पर्यवेक्षक एस एन पाटील यांनी मानले.

या कार्यक्रमास डॉ राहूल माका उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार उपप्राचार्य प्रा.उत्तमकुमार कांबळे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते

Scanned with OKEN Scanner